## स्वच्छ भारत मिशनअंतर्गत शासनाने
## महानगरपालिकेची घेतलेली बैठक

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत आज दिनांक 22 डिसेंबर 2016 रोजी स्वच्छता सर्व्हेक्षण-2017 च्याअनुषंगाने महाराष्ट्र शासनाचे उप सचिव श्री. सुधाकर बोबडे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात महापालिका आयुक्त श्री..वि.ना.काळम, सहा.आयुक्त श्री.हाराळे श्री.नरेंद्र काटीकर, संचालक स्मार्ट सिटी, श्री. जितंद्र यादव, घन कचरा व्यवस्थापन तज्ञ, श्री.ठेंगळे पाटील, प्रशासनाधिकारी नगरपालिका शाखा, विभागीय अधिकारी, श्री.दत्तात्रय चौगुले श्री.संजय जोगधनकर, मुख्य सफाई अधिक्षक व सर्व सफाई निरीक्षक यांचे समवेत बैठक घेतली.

स्वच्छता सर्व्हेक्षण 2017 हा दिनांक 4 जानेवारी ते 4 फेब्रुवारी 2017 अखेर या काळात होणार असून या सर्व्हेक्षणामध्ये भारतातील 500 शहराचा समावेश आहे. शहरातील स्वचछतेचा दर्जा उंचाविणे, शहराचे मूल्यमापन करुन गुणांकन ठरविणे हे या सर्व्हेक्षणाचा उददेश आहे.

या स्वच्छता सर्व्हेक्षणाच्या मूल्यमापनामध्ये प्रामुख्याने खालील बाबी पाहिल्या जाणार आहेत.

शहरातील हागणदारी मुक्त करणे, सर्व समावेशक घन कचरा व्यवस्थापन योजना, घरोघरी कचरा संकलन करणे, झाडलोट, संकलन वाहतूक, प्रक्रिया आणि विल्हेवाट, सार्वजनिक तसेच सामाजिक स्वच्छतेची व्यवस्था, वैयक्तीक शौचालय इ. बाबीचा समावेश आहे.

श्री. सुधाकर बोबडे, उप सचिव यांनी ज्या बाबीचा सर्व्हेक्षण करण्यात येणार आहे, त्या बाबीच्याअनुषंगाने सविस्तर मार्गदर्शन करुन शहराचे मूल्यांकन हे जास्तीत जास्त रहावे यासाठी महत्वपूर्ण सूचना केल्या.

महानगरपालिकेतर्फे स्वच्छता MoUD ॲप हे जास्तीत जास्त नागरिंकानी डाऊनलोड करुन या ॲपवर स्वच्छतेच्या समस्या पाठवावयाच्या आहेत.

महानगरपालिकेचे आयुक्त श्री.वि.ना.काळम या स्वच्छता सर्व्हेक्षण 2017 अंतर्गत करावयाच्या आवश्यक त्या बाबीच्या सूचना सविस्तरपणे दिल्या व वैयक्तीक शौचालये हे कोणत्याही परिस्थितीमध्ये 15 फेब्रुवारी 17 पर्यंत पूर्ण कराव्यात तसेच संपूर्ण शहर दिनांक 31 मार्च 2017 पर्यंत हागणदारी मुक्त करावे अशाही सूचना या बैठकीत दिल्या.